स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

संशोधन विषयाचा आराखडा

विषय : ग्रामीण युवकांच्या विवाह संबंधित समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन

संशोधक विद्यार्थी

श्रीमती आशा गरुड

संशोधक मार्गदर्शक

प्रा. डॉ. सुनिता टेंगसे

समाजशास्त्र विभाग प्रमुख

कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ

ता. सोनपेठ जि. परभणी

अध्ययन केंद्र

समाजशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

2024

ग्रामीण युवकांच्या विवाह संबंधित समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन

संशोधन आराखडा

1) प्रस्तावना :

आधुनिकीकरणामुळे संपूर्ण जग जवळ आले आहे. विविध तंत्रज्ञान, संगणक, मोबाईल, समाज माध्यमे यामुळे तर "कर लो दुनिया मुठ्ठी में " अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या बदलाचे वारे आता शहरासोबतच गावागावांमधूनही वेगाने वाहू लागले आहेत. वेगाने होणारे परस्पर संवाद, ज्ञानाचा झालेला प्रस्फोट, कामांमध्ये तंत्रज्ञानामुळे झालेले सुलभीकरण या सगळ्या जमेच्या बाजू असल्या तरी बदलत्या काळात अनेक प्रश्नही निर्माण झाले आहेत. ज्ञान विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे जग जवळ आलेले असले तरी माणसांमधला परस्पर संवाद मात्र हरवत चालला आहे. विज्ञानामुळे जगातल्या गोष्टी क्षणार्धात कळत असल्या तरी वाचलेल्या वेळेचा सदुपयोग म्हणावा तसा होत नाही. तंत्रज्ञानामुळे काम सुलभ झाले आहे. उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण यांच्या प्रभावापासून आता खेडीही अलिप्त राहू शकलेली नाहीत. याचे एकीकडे काही सकारात्मक तर काही नकारात्मक परिणाम ही होताना दिसत आहेत. त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्याही आता भीषण स्वरूप धारण करत आहेत. बदलत्या काळाची आव्हाने पेलताना न आल्यामुळे व काळासोबत आपली गती जुळवता न आल्याने समाज व्यवस्थेवर याचा अनिष्ट परिणाम दिसून येत आहे. पर्यावरण, निसर्ग, युवक, महिला, कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, गावगाडा यामुळे बाधित होताना दिसत आहे. या अनिष्ट परिणामांपासून

सावरण्यासाठी वेळीच उपाययोजना करणे आवश्यक आहे. अन्यथा समाजाला अनेक भीषण परिणामांना सामोरे जावे लागणार आहे.

विवाह संस्था ही एक भारतातील एक प्राचीन संस्था आहे. जगभरातील विचारवंतांनी भारतीय विवाह संस्थेबद्दल गौरवोद्‌गार काढलेले आहे. या विवाह संस्थेत भलेही काही दोष असतील मात्र तिची अपरिहार्यताही आवश्यक असल्याचे मत मांडलेले आहे. आज भारतीय समाजात लोकसंख्येतील स्त्री-पुरूषांचे विषम प्रमाण, भ्रूणहत्या अशा अनेक कारणांनी वयात आलेल्या पुरूषांना योग्य जोडीदार मिळत नाही. एका-एका गावात शेकडो मुले विनालग्नाची आहेत. मात्र त्यांना सहजीवनासाठी जोडीदार मिळत नाही.

तर उच्च शिक्षीत मूला-मुलींना त्यांच्या अनुरूप जोडीदार मिळत नाही. ज्यांचे विवाह झाले आहेत अशा जोडप्यांचे वैवाहीक आयुष्य नोकरी, अर्थप्राप्ती यामूळे धोक्यात आले आहे. जोडीदार न मिळाल्याने अस्वस्थ तरूण पिढी लैंगीक समस्या, मोबाईल व इतर व्यसनांच्या अधीन होत आहे.

अनेक युवक जोडीदाराची भिन्न जीवन शैली, भिन्न व्यवसाय, भिन्न शिक्षण यामुळे असमाधानी असून यातून घटस्फोटांचे प्रमाण वाढले आहे. अनेक कुटूंबांनी तर मुला-बाळांसहीत सामूहिक आत्महत्येचा टोकाचा पर्याय निवडल्याच्या बातम्या वर्तमानपत्रात वाचायला मिळतात. अल्पसंख्यांक समुहात तर मुलींचे प्रमाण अत्यल्प झाले आहे. या समाजात मुलींची खरेदी करण्याचे गैरप्रकार घडून येत आहे. या

समाजातील अविवाहीत तरूण वेश्यागमनाकडे वळून अनेक रोगांना बळी पडत आहेत.

स्त्री-पुरूषांचे सहजीवन हीच शांततापुर्ण जीवनाची गुरूकिल्ली आहे. या सहजीवनातून कौटुंबिक सौख्य मिळाल्याने युवकांचे जीवन सुखी-समाधानी होणार आहे. म्हणून सद्यस्थितीत युवकांच्या वैवाहीक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन होणे काळाची गरज आहे.

2) संशोधन विषय :

प्रस्तुत संशोधनासाठी "ग्रामीण युवकांच्या विवाह संबंधित समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन" या विषयाची निवड केली असून त्यासाठी विशेष संदर्भ म्हणून परभणी जिल्हयाची निवड करण्यात आली आहे.

3) संशोधन विषयाची निवड :

प्रस्तुत संशोधनाचा विषय हा माझ्या आवडीचा, विशेष रुची असलेला असून सध्या ग्रामीण भागात अनेक युवकांच्या विवाह संबंधित समस्या भेडसावताना दिसून येत आहेत. त्या समस्यांचे निराकरण करणे ही काळाची गरज आहे. या समस्यांची उकल करण्यासाठी या विषयाचा शास्त्रीय पद्धतीने विचार करणे गरजेचे आहे. शास्त्रीय पद्धतीने या विषयाचा विचार केल्यास वस्तुनिष्ट माहिती प्राप्त होईल आणि या माहितीच्या आधारे या समस्या तिचे स्वरूप व तिव्रता जाणून घेऊन तीचे निर्मुलन करण्यास मदत होईल. म्हणून प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

ग्रामीण युवकांच्या विवाह संबंधित समस्येस कोण कोण घटक जबाबदार आहेत त्यांचा शोध घेऊन निराकरण करण्यासाठी प्रस्तुत विषय निवडला आहे.

4) संशोधन विषयाची गरज व महत्त्व :

भारत हा बहुसंख्य खेड्यांचा देश आहे. ग्रामीण युवकांच्या विवाहाशी संबंधित समस्या दिवसेंदिवस तीव्र स्वरूप धारण करत आहेत. दिवसागणिक यात वाढ होत असून त्याचे समाजावर अनिष्ट परिणाम होत आहेत. देशाच्या विकासासाठी महत्त्वाचे योगदान असणारा युवक हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. संपूर्ण देशाची प्रगती याच घटकावर मुख्यतः अवलंबून आहे. म्हणून ग्रामीण व शहरी भागातील विवाह विषयक समस्यांचा सखोल अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. या समस्या जाणून घेऊन युवकांचे प्रश्न, त्यांच्या अडचणी कुटुंब, पालक - शिक्षक - मार्गदर्शक व जबाबदार शासन या सर्वांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे आहे. असे झाल्याने समाजामध्ये अनेक सकारात्मक बदल घडून येतील. यासाठी या संशोधनाची गरज व महत्त्व अनन्यसाधारण आहे.

5) संशोधनाची उद्दिष्टे :

संशोधन विषयाची निवड झाल्यावर संशोधनाची उद्दिष्टे निश्चित करणे आवश्यक असते.

1) ग्रामीण युवकांच्या विवाह संबंधी समस्यांचा सैद्धांतिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे.

2) युवकांच्या विवाह विषयक समस्यांना जबाबदार असणाऱ्या कारणांचा शोध घेणे.

3) या समस्या का वाढत आहेत? त्याचा मुळाशी जाऊन शोध घेणे.

4) संस्कृती, धर्म, कौटुंबिक, आर्थिक प्रणाली, जाती व्यवस्था, आधुनिकीकरण, जागतिकीकरण हे या समस्यांना कितपत प्रमाणात जबाबदार आहेत याचा शोध घेणे.

5) या विवाह विषयक समस्या निर्मुलनासाठी विविध उपायांचा शोध घेणे.

6) या समस्यांची तीव्रता कमी करण्यासाठी उपाय योजना सुचवणे.

7) या समस्येस कारणीभूत असणारी संस्थात्मक परिवर्तने जबाबदार आहेत का याचा शोध घेणे.

6) गृहीतके :

योग्य गृहीतकांची मांडणी म्हणजे संशोधनाची योग्य वाटचाल. संशोधनकर्त्याचे संशोधन भरकटत जाऊ नये यासाठी गृहीतके निर्मिती महत्त्वाची असतात. प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहीतके गृहीत धरलेली आहेत.

1) भारतीय लोकसंख्येतील स्त्री-पुरुषांचे विषम प्रमाण यामुळे विवाह संबंधीत समस्यांची निर्मित होत आहे.

2) बेरोजगारी, कौशल्याचा अभाव, पुरुष विषमता, आर्थिक विषमता व शैक्षणिक उदासीनता यामुळे युवकांच्या विवाह संबंधीत समस्या निर्माण होत आहेत.

3) विवाह संबंधीत समस्यांमुळे भारतीय तरुणांमध्ये व्यसनाधीनता गुन्हेगारी, नैराश्य, ताणतणाव, घटस्फोट, आत्महत्या अशा समस्यांमध्ये वाढ होत आहे.

4) कौशल्य शिक्षणाची आवश्यकता आज अधीक प्रमाणात आहे.

5) ग्रामीण भागातील आर्थिक मागासलेपण, पायाभूत सुविधांचा अभाव, शहरीकरणाने प्रभावीत झालेली जीवनशैली, नोकरी केंद्रीत शिक्षण व्यवस्था, बेकारी यांचा विवाह संबंधीत समस्यांचा जवळचा संबंध आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी अन्वेषणात्मक आराखडा या प्रकाराचा उपयोग करण्यात येईल. संशोधनासाठी परभणी जिल्हा हे क्षेत्र निर्धारित असून नमुना निवड तंत्राचा अवलंब करण्यात आला असून तथ्ये संकलनासाठी मुलाखत, अनुसूची व व्यष्टी अध्ययन पध्दती यांचा वापर करण्यात येईल. या समस्येस जबाबदार असलेल्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, जातीसंबंधीत, कौटुंबिक, सांस्कृतिक, धार्मिक, मानसिक इत्यादी कारणांचा शोध घेणे. परिस्थितीचे यथागत वर्णन करण्यासाठी अन्वेषणात्मक आराखड्याचा अवलंब करण्यात येईल.

7) नमुना निवड पद्धती :

या संशोधन पद्धतीमध्ये संपूर्ण लोकसंख्येमधून विशिष्ट प्रतिनिधी समूहाची निवड करून त्याचे वस्तुनिष्ट पध्दतीने अध्ययन केले जाईल.

प्रस्तुत संशोधनात गैरसंभाव्यता (नॉन पेरोमेट्रिक) सहेतुक नमुना निवड पद्धतीचा अवलंब केलेला आहे. परभणी जिल्हयातील नऊ तालुक्यातील ग्रामीण भागातील विवाह विषयक समस्यांचा वस्तुनिष्ठपणे अभ्यास करण्यासाठी 200 पुरुष 100 स्त्रिया यांची निवड करताना अध्ययनासाठी नमुना निवड ग्रामीण, शहरी, दुर्गम, विविध जाती, धर्म समूह, अल्पसंख्यांक समूह व आर्थिक विषम समूह यातील नमुना निवड पध्दतीने निवडण्यात येतील.

8) तथ्य संकलनाच्या पद्धती व तंत्रे :

कोणत्याही संशोधनामध्ये तथ्य संकलनाच्या पद्धती व तंत्रे ही अत्यंत महत्त्वाची असतात. विविध सामाजिक घटनांचे, समस्यांचे अध्ययन करून त्या घटनांसंबंधी तथ्ये संकलित केली जातात. त्यावर आधारित निष्कर्ष काढले जातात. अचूक निष्कर्ष येण्यासाठी वैज्ञानिक अथवा शास्त्रीय पद्धतीने तथ्य संकलन करणे गरजेचे असते. या तथ्यांच्या सहाय्याने संशोधनाला एक विशिष्ट स्वरूप प्राप्त होते. ग्रामीण भागातील तरुणांच्या विवाह विषयक समस्या या अभ्यास विषयासाठी व माहिती संकलन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन साधनाचा अवलंब करण्यात येईल. गुणात्मक व संख्यात्मक अशा दोन्ही संकलन पद्धतीचा म्हणजेच मिश्र पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. मुलाखत, अनुसूची, आकडेवारी, वर्तमानपत्रे, मासिके, नियतकालिके, समाजशास्त्रीय संशोधने शोध प्रबंध, सरकारी अहवाल, लेख, संदर्भ ग्रंथे इत्यादी साधनांचा वापर करून निष्कर्ष व अनुमान काढण्यात येईल. तथ्य संकलनानंतर त्यांची पद्धतशीर शास्त्रीय पद्धतीने मांडणी करून विश्लेषण व निर्वचन केले जाईल. यासाठी तथ्यांचे सांकेतिकीकरण वर्गीकरण व सारणीकरण करण्यात येईल. प्रस्तुत संशोधन विषयासंबंधी प्राप्त तथ्यांवर संस्करण व प्रक्रिया करून ती तथ्ये व्यवस्थित क्रमात संगतवार ठेवून त्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले जाईल. जेणेकरून या विषयाला संपूर्णपणे शास्त्रीय पद्धतीने न्याय देता येईल.

शास्त्रीय पद्धतीने निष्कर्षणाचे निर्वचन झाल्यानंतर संशोधक गृहीत कृत्यांची पडताळणी करून कोणती गृहीत कृत्ये सत्य आहेत व कोणती असत्य ठरतात याची शहानिशा केली जाईल व पडताळा घेतला जाईल.

9) संशोधन विषयाच्या अध्ययनाचे क्षेत्र :

कोणत्याही विषयाचे संशोधन करत असताना त्याचे क्षेत्र निश्चित करूनच संशोधन करावे लागते. संशोधन विषयाचे क्षेत्र मर्यादित केल्याशिवाय संशोधकाला निष्कर्षापर्यंत पोहोचता येत नाही. प्रस्तुत संशोधन विषयाचे क्षेत्र परभणी जिल्हयातील नऊ तालुक्यातील ग्रामीण क्षेत्रात राहणारा युवक असे निश्चित केले आहे.

10) संशोधन विषयाची व्याप्ती आणि मर्यादा :

कुठल्याही संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा निश्चित केल्याशिवाय संशोधनाला साचेबंद चौकटीत बांधता येत नाही. संशोधकाला अचूक निष्कर्षाप्रत पोहोचायचे असेल तर संशोधनाचे क्षेत्र, संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा निश्चित करून घ्यावी लागते. सदरील संशोधनासाठी परभणी जिल्हयातील ग्रामीण भागात राहणाऱ्या युवकांच्या विवाह विषयक समस्या जाणून घेण्यासाठी मुलाखत, अनुसूची व व्यष्टी अध्ययन तंत्राचा वापर करून त्यासाठी जबाबदार घटक, वैयक्तिक, धार्मिक, कौटुंबिक, आर्थिक परिस्थिती कशी कारणीभूत आहे याचा शोध घेतला जाईल.

11) संशोधनाच्या प्रकरणांची रूपरेषा :

प्रस्तुत प्रबंध सहा प्रकरणांमध्ये सुनियोजित केला आहे. त्याची रूपरेषा खालील प्रमाणे -

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : संशोधन पद्धती व संबंधित साहित्याचा आढावा.

प्रकरण तिसरे : ग्रामीण युवकांची कौटुंबिक, सामाजिक स्थिती व आधुनिकीकरणाचा विवाह संबंधीत समस्यांवरील प्रभाव.

प्रकरण चौथे : ग्रामीण युवकांची शैक्षणिक, आर्थिक स्थिती व जागतिकीकरणाच्या विवाह संबंधीत समस्यांवरील प्रभाव.

प्रकरण पाचवे : ग्रामीण युवकांची जातीय, धार्मिक, मानसिक स्थिती व चंगळवादी प्रवृत्तीचा वाढत्या विवाह संबंधीत समस्यांवरील प्रभाव.

प्रकरण सहावे : निष्कर्ष, सूचना, शिफारशी

✓ **संदर्भ ग्रंथ सूची**

1) प्रदीप आगलावे (2007) - सामाजिक संशोधन पद्धती
2) डॉ.भा.कि.खडसे (1950) - भारतीय सामाजिक समस्या, श्री मंगेश प्रकाशन
3) रॉबर्ट बॅरॉन - अनुवाद साधना नातू, (2012) सामाजिक मानसशास्त्र, पेरसन पब्लिकेशन्स दिल्ली
4) डॉ. आगलावे प्रदीप - संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र, विद्या प्रकाशन नागपूर
5) डॉ बोधनकर सुधीर प्रा विवेक आलोणी- सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर

6) कायंदे पाटील गंगाधर - सामाजिक संशोधन पद्धती, चैतन्य पब्लिकेशन्स नाशिक

7) पाटील वा. भा. (2012)- संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव

8) जोशी अनंत (2014) - सामाजिक संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र, साईनाथ प्रकाशन नागपूर

9) जोशी अनंत आणि कर्डिले वसंत (2012)- सामग्री विश्लेषण अन्वयार्थ संशोधन आणि अहवाल लेखन, य.च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

10) केतकर श्रीधर व्यंकटेश (1994) भारतीय समाजशास्त्र, वरद प्रकाशन पुणे

11) गायकवाड लक्ष्मण (2001) - साहित्य समाज आणि स्वातंत्र्य, दिलीप राज प्रकाशन, पुणे

- ✓ **मुलाखत व अनुसूची**
- ✓ **परिशिष्टे व छायाचित्रे**

मार्गदर्शक	**संशोधक विद्यार्थी**
प्रा.डॉ. सुनिता टेंगसे समाजशास्त्र विभाग प्रमुख कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ ता. सोनपेठ जि. परभणी	**श्रीमती आशा गरुड**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

संशोधन विषयाचा आराखडा

विषय : ग्रामीण युवकांच्या विवाह संबंधित समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन, विशेष संदर्भ परभणी जिल्हा

संशोधक विद्यार्थी

श्रीमती आशा गरुड

संशोधक मार्गदर्शक

प्रा. डॉ. सुनिता टेंगसे

समाजशास्त्र विभाग प्रमुख

कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ

ता. सोनपेठ जि. परभणी

अध्ययन केंद्र

समाजशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

2024

ग्रामीण युवकांच्या विवाह संबंधित समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन, विशेष संदर्भ परभणी जिल्हा

1) प्रस्तावना :

आधुनिकीकरणामुळे संपूर्ण जग जवळ आले आहे. विविध तंत्रज्ञान, संगणक, मोबाईल, समाज माध्यमे यामुळे तर "कर लो दुनिया मुठ्ठी में" अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या बदलाचे वारे आता शहरासोबतच गावागावांमधूनही वेगाने वाहू लागले आहेत. वेगाने होणारे परस्पर संवाद, ज्ञानाचा झालेला प्रस्फोट, कामांमध्ये तंत्रज्ञानामुळे झालेले सुलभीकरण या सगळ्या जमेच्या बाजू असल्या तरी बदलत्या काळात अनेक प्रश्नही निर्माण **झाले** आहेत. ज्ञान विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे जग जवळ आलेले असले तरी माणसांमधला परस्पर संवाद मात्र हरवत चालला आहे. विज्ञानामुळे जगातल्या गोष्टी क्षणार्धात कळत असल्या तरी वाचलेल्या वेळेचा सदुपयोग म्हणावा तसा होत नाही. तंत्रज्ञानामुळे काम सुलभ झाले आहे. उदारीकरण, खाजगीकरण, जागतिकीकरण यांच्या प्रभावापासून आता खेडीही अलिप्त राहू शकलेली नाहीत. याचे एकीकडे काही सकारात्मक तर काही नकारात्मक परिणाम ही झाले आहेत. त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्याही आता भीषण स्वरूप धारण करत आहेत. बदलत्या काळाची आव्हाने **पेलता न आल्यामुळे** व काळासोबत आपली गती जुळवता न आल्याने समाज व्यवस्थेवर याचा अनिष्ट परिणाम झाला आहे. पर्यावरण, निसर्ग, युवक, महिला, जातीसंस्था, धर्म संस्था, कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, अर्थसंस्था आणि एकंदरीत गावगाडा यामुळे बाधित **झाले** आहे. या अनिष्ट परिणामांपासून सावरण्यासाठी वेळीच

उपाययोजना करणे आवश्यक आहे. अन्यथा समाजाला अनेक भीषण परिणामांना सामोरे जावे लागले.

विवाह संस्था ही एक भारतातील एक प्राचीन संस्था आहे. जगभरातील विचारवंतांनी भारतीय विवाह संस्थेबद्दल गौरवोद्‌गार काढलेले आहे. या विवाह संस्थेत भलेही काही उनिवा असतील मात्र तिची अपरिहार्यता मान्य करावी लागेल. आज भारतीय समाजात लोकसंख्येतील स्त्री-पुरूषांचे विषम प्रमाण, भ्रूणहत्या, आधुनिकीकरणाचा प्रभाव, सुखाच्या बदललेल्या संकल्पना, चंगळवादी प्रवृत्तीतील वाढ अशा अनेक कारणांनी वयात आलेल्या पुरूषांना योग्य जोडीदार मिळत नाही. एका- एका गावात शेकडो मुले वयाचे 45 वर्ष पार केली आहे. मात्र त्यांना सहजीवनासाठी जोडीदार मिळत नाही.

तर उच्च शिक्षीत मूला-मुलींना त्यांच्या अनुरूप जोडीदार मिळत नाही. ज्यांचे विवाह झाले आहेत अशा जोडप्यांचे वैवाहीक आयुष्य नोकरी, अर्थप्राप्ती यामूळे धोक्यात आले आहे. अशा स्वरूपाच्या विविध समस्या विवाह संबंधित समाजात प्रचलित आहेत. परंतु आज **गाव, वाडी, तांड्‌याचा** विचार करता प्रत्येक गावात वय वर्ष 45 ते 50 च्या दरम्यानच्या अविवाहित मुलांची संख्या ही दिवसेंदिवस वाढत आहे. जोडीदार न मिळाल्याने अस्वस्थ तरूण पिढी मानसिक अवस्था बिकट बनत आहे, याबरोबरच लैंगीक समस्या, व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढत आहे. विविध स्वरूपाच्या ताण तणावाचा सामना करून त्यांचे मनोबल ढासळत आहे, अल्पसंख्यांक समुहात तर मुलींचे प्रमाण अत्यल्प झाले आहे. या समाजात मुलींची खरेदी करण्याचे गैरप्रकार घडून येत आहे. या समाजातील अविवाहीत तरूण वेश्यागमनाकडे वळून अनेक शारीरिक रोगांना बळी पडत आहेत.

स्त्री-पुरूषांचे सहजीवन हीच शांततापुर्ण जीवनाची गुरूकिल्ली आहे. या सहजीवनातून कुटुंब आणि समाज स्थिर होण्यास मदत होते. प्रत्येक व्यक्ती सुखी-समाधानी होऊन आपले कुटुंबाप्रती आणि समाजाप्रतीची कर्तव्य पूर्ण करण्यास शारीरिक, मानसिकदृष्ट्या सक्षम बनेल म्हणून सद्यस्थितीत युवकांच्या वैवाहीक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन होणे आवश्यक आहे.

2) संशोधन विषय :

प्रस्तुत संशोधनासाठी "ग्रामीण युवकांच्या विवाह संबंधित समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन" (विशेष संदर्भ परभणी जिल्हा) या विषयाची निवड केली आहे.

अविवाहित मुलांचे वाढती संख्या ही समस्या आधुनिक समाजात नव्याने निर्माण झालेली असून ग्रामीण भागही यापासून वंचित राहिलेला नाही. सध्या ग्रामीण भागात अनेक युवकांच्या विवाह संबंधित समस्या भेडसावताना दिसून येत आहेत. त्या समस्यांचे निराकरण करणे ही काळाची गरज आहे. या समस्यांची उकल करण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने या विषयाचा विचार केल्यास वस्तुनिष्ट माहिती प्राप्त होईल आणि या माहितीच्या आधारे या समस्येचे स्वरूप व तिव्रता जाणून घेऊन समस्येवर उपाययोजना सुचविण्यासाठी आणि समस्येचे निर्मुलन करण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाची निवड केली आहे.

3) संशोधनाचे महत्त्व :

भारत हा बहुसंख्य खेड्यांचा देश आहे. ग्रामीण युवकांच्या विवाहाशी संबंधित समस्या दिवसेंदिवस तीव्र स्वरूप धारण करत आहेत. दिवसागणिक

यात वाढ होत असून त्याचे समाजावर अनिष्ट परिणाम होत आहेत. देशाच्या विकासासाठी महत्त्वाचे योगदान असणारा युवक हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. संपूर्ण देशाची प्रगती याच घटकावर मुख्यतः अवलंबून आहे. म्हणून ग्रामीण भागातील विवाह विषयक समस्यांचा सखोल अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. या समस्या जाणून घेऊन युवकांचे प्रश्न, त्यांच्या विविध स्तरावरील अडचणी कोणत्या स्वरूपाच्या आहेत, या परिस्थितीला कोणते घटक जबाबदार आहेत, आणि या समस्या सोडवण्यासाठी कोणत्या बाबींची आवश्यकता आहे याचा शोध शास्त्रीय पद्धतीने प्रस्तुत संशोधनात केला जाणार म्हणून हे संशोधन महत्त्वाचे आहे. असे झाल्याने समाजामध्ये अनेक सकारात्मक बदल घडून येतील. यासाठी या विषयावर शास्त्रीय पद्धतीने अध्ययन करण्याची आवश्यकता आहे

4) संशोधनाची उद्दिष्टे :

1. ग्रामीण युवकांच्या विवाह संबंधी समस्यांचा शास्त्रीय आणि सैद्धांतिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे.
2. युवकांच्या विवाह विषयक समस्यांना जबाबदार असणाऱ्या कारणांचा शोध घेणे.
3. बेरोजगारी, शासकीय नोकरी नसणे, ग्रामीण जीवन पद्धतीच्या स्वीकारा बाबतची उदासीनता, आर्थिक सुबत्तेचा अभाव, स्त्री-पुरुषांचे विसंगत प्रमाण, उच्च शिक्षणाबाबत असणारी उदासीनता, मुलींच्या व पालकांच्या वाढत्या अपेक्षा, सौंदर्याच्या बदलते व्याख्या, मुलींच्या पसंतीचे वाढते महत्त्व, शहराचे वाढते आकर्षण, चंगळवादी जीवनाला दिली जाणारी

पसंती अशा स्वरूपाची परिस्थिती अविवाहित मुलांच्या संख्येत वाढ होण्यास जबाबदार आहे.

4. जाती व्यवस्था, धर्म व्यवस्था, आधुनिकीकरण, जागतिकीकरण हे घटक अविवाहित मुलांच्या समस्या **निर्मितीस** कितपत प्रमाणात जबाबदार आहेत याचा शोध घेणे.
5. अविवाहित मुलांच्या समस्यांचे निर्मुलनासाठी विविध उपायांचा शोध घेणे.
6. संस्थात्मक परिवर्तनास व्यक्ती आणि समाजाची मानसिकता आणि सामाजिक परिवर्तन जबाबदार आहेत का याचा शोध घेणे.

5) गृहीतके :

1. **भारतीय** लोकसंख्येतील स्त्री-पुरुषांचे विषम प्रमाण यामुळे अविवाहित मुलांच्या समस्या निर्माण होत आहेत.
2. कौशल्याचा अभाव, स्त्री-पुरुष विषमता, आर्थिक विषमता व शैक्षणिक उदासीनता यामुळे युवकांच्या विवाह संबंधीत समस्या निर्माण होत आहेत.
3. विवाह संबंधीत समस्यांमुळे भारतीय तरुणांमध्ये व्यसनाधीनता, गुन्हेगारी, नैराश्य, झीडझीडी वृत्ति, ताणतणाव, एकलकोंडेपणा, आत्महत्या, यासारख्या समस्यांमध्ये वाढ होत आहे.
4. कौशल्य शिक्षणाची आवश्यकता, त्याला पूरक अभ्यासक्रम आणि त्याविषयी असणाऱ्या जनजागृतीची आज नितांत आवश्यकता आहे.
5. ग्रामीण भागातील आर्थिक मागासलेपण, पायाभूत सुविधांचा अभाव, शहरीकरणाने प्रभावीत झालेली जीवनशैली, नोकरी केंद्रीत शिक्षण व्यवस्था, बेकारी यांचा विवाह संबंधीत समस्यांचा जवळचा संबंध आहे.

6) संशोधन आराखडा:

प्रस्तुत संशोधनात अविवाहित मुलांच्या समस्येशी संबंधित परिस्थिती का ?, कधी ?, कुठे ?, केव्हा ?, निर्माण झाली याचे यथार्थ माहितीची मांडणी करण्यासाठी अन्वेषणात्मक आराखड्याचा अवलंब करण्यात येईल.

7) नमुना निवड पद्धती :

सहेतुक नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. परभणी जिल्ह्यातील नऊ तालुक्यातील ग्रामीण भागातील विवाह विषयक समस्यांचा वस्तुनिष्ठपणे अभ्यास करण्यासाठी 200 पुरुष आणि 100 स्त्रिया यांची निवड करताना सहेतुक नमुना निवडीच्या आधारे केली जाणार आहे.

8) तथ्य संकलनाच्या पद्धती व तंत्रे :

विविध सामाजिक घटनांचे, समस्यांचे अध्ययन करून त्या घटनांसंबंधी तथ्ये संकलित केली जातात. त्यावर आधारित निष्कर्ष काढले जातात. अचूक निष्कर्ष येण्यासाठी वैज्ञानिक अथवा शास्त्रीय पद्धतीने तथ्य संकलन करणे गरजेचे असते. या तथ्यांच्या सहाय्याने संशोधनाला एक विशिष्ट स्वरूप प्राप्त होते. ग्रामीण भागातील तरुणांच्या विवाह विषयक समस्या या अभ्यास विषयासाठी व माहिती संकलन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलन साधनाचा अवलंब करण्यात येईल. गुणात्मक व संख्यात्मक अशा दोन्ही संकलन पद्धतीचा म्हणजेच मिश्र पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. मुलाखत अनुसूची, आकडेवारी, वर्तमानपत्रे, मासिके, नियतकालिके, समाजशास्त्रीय संशोधने, शोध प्रबंध, प्रशासकीय अहवाल, लेख, संदर्भ ग्रंथे इत्यादी साधनांचा वापर करून निष्कर्ष काढण्यात येतील. तथ्य संकलनानंतर त्यांची पद्धतशीर

शास्त्रीय पद्धतीने मांडणी करून विश्लेषण व **निर्वचन** केले जाईल. यासाठी तथ्यांचे सांकेतिकीकरण वर्गीकरण व सारणीकरण करण्यात येईल. प्रस्तुत संशोधन विषयासंबंधी प्राप्त तथ्यांवर संस्करण व प्रक्रिया करून ती तथ्ये व्यवस्थित क्रमात **संगतवार** ठेवून त्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले जाईल. जेणेकरून या विषयाला संपूर्णपणे शास्त्रीय पद्धतीने न्याय देता येईल.

शास्त्रीय पद्धतीने निष्कर्षाचे **निर्वचन** झाल्यानंतर संशोधक गृहीत कृत्यांची पडताळणी करून कोणती गृहीत कृत्ये सत्य आहेत व कोणती असत्य ठरतात याची शहानिशा केली जाईल व पडताळा घेतला जाईल.

9) संशोधन विषयाच्या अध्ययनाचे क्षेत्र :

कोणत्याही विषयाचे संशोधन करत असताना त्याचे क्षेत्र निश्चित करूनच संशोधन करावे लागते. संशोधन विषयाचे क्षेत्र मर्यादित केल्याशिवाय संशोधकाला निष्कर्षापर्यंत पोहोचता येत नाही. प्रस्तुत संशोधन विषयाचे क्षेत्र परभणी जिल्हयातील नऊ तालुक्यातील ग्रामीण भागात राहणारा युवक हा संशोधनाचा केंद्रबिंदू असेल.

10) संशोधन विषयाची व्याप्ती आणि मर्यादा :

कुठल्याही संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा निश्चित केल्याशिवाय संशोधनाला साचेबंद चौकटीत बांधता येत नाही. संशोधकाला अचूक **निष्कर्षापर्यंत** पोहोचायचे असेल तर संशोधनाचे क्षेत्र, संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा निश्चित करून घ्यावी लागते. सदरील संशोधनासाठी परभणी जिल्हयातील ग्रामीण भागात राहणाऱ्या युवकांच्या विवाह विषयक समस्या जाणून घेण्यासाठी मुलाखत, अनुसूची व व्यष्टी अध्ययन तंत्राचा वापर करून

त्यासाठी जबाबदार घटक, वैयक्तिक, धार्मिक, कौटुंबिक, आर्थिक परिस्थिती कशी कारणीभूत आहे याचा शोध घेतला जाईल.

11) संशोधनाच्या प्रकरणांची रूपरेषा :

प्रस्तुत प्रबंध सहा प्रकरणांमध्ये सुनियोजित केला आहे. त्याची रूपरेषा खालील प्रमाणे-

1) प्रकरण पहिले : प्रस्तावना

2) प्रकरण दुसरे : संशोधन पद्धती व संबंधित साहित्याचा आढावा

3) प्रकरण तिसरे : ग्रामीण युवकांची कौटुंबिक, सामाजिक स्थिती व आधुनिकीकरणाचा विवाह संबंधीत समस्यांवरील प्रभाव.

4) प्रकरण चौथे : ग्रामीण युवकांची शैक्षणिक, आर्थिक स्थिती व जागतिकीकरणाच्या विवाह संबंधीत समस्यांवरील प्रभाव.

5) प्रकरण पाचवे : ग्रामीण युवकांची जातीय, धार्मिक, मानसिक स्थिती व चंगळवादी प्रवृत्तीचा विवाह संबंधीत समस्यांवरील प्रभाव.

6) प्रकरण सहावे : निष्कर्ष, सूचना, शिफारशी.

संदर्भ ग्रंथ सूची :

1) प्रदीप आगलावे (2007) - सामाजिक संशोधन पद्धती

2) डॉ.भा.कि.खडसे (1950) - भारतीय सामाजिक समस्या, श्री मंगेश प्रकाशन

3) रॉबर्ट बॅरॉन - अनुवाद साधना नातू, (2012) सामाजिक मानसशास्त्र, पेरसन पब्लिकेशन्स दिल्ली.

4) डॉ बोधनकर सुधीर प्रा विवेक आलोणी- सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर

5) कायंदे पाटील गंगाधर - सामाजिक संशोधन पद्धती, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक

6) पाटील वा. भा. (2012)- संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव

7) जोशी अनंत (2014) - सामाजिक संशोधन पद्धती शास्त्र व तंत्र, साईनाथ प्रकाशन नागपूर

8) जोशी अनंत आणि कर्डिले वसंत (2012)- सामग्री विश्लेषण अन्वयार्थ संशोधन आणि अहवाल लेखन, य.च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

9) केतकर श्रीधर व्यंकटेश (1994) भारतीय समाजशास्त्र, वरद प्रकाशन पुणे

10) गायकवाड लक्ष्मण (2001) - साहित्य समाज आणि स्वातंत्र्य, दिलीप राज प्रकाशन, पुणे

- ✓ **मुलाखत व अनुसूची**
- ✓ **परिशिष्टे व छायाचित्रे**

मार्गदर्शक

प्रा.डॉ. सुनिता टेंगसे
समाजशास्त्र विभाग प्रमुख
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ ता. सोनपेठ जि. परभणी

संशोधक विद्यार्थी

श्रीमती आशा गरुड